## थोडक्यात



### पृथ्वी-२ची यशस्वी चाचणी

अण्वस्त्रे वाहून नेण्याची व ३५० किमीपर्यंत मारा करण्याची क्षमता असलेल्या 'पृथ्वीर' क्षेपणास्त्राची ओदिशातील बालासोरजवळील चंडिपूर येथे इंटिग्रेटेड टेस्ट रेंजवरून गुरुवारी यशस्वी चाचणी करण्यात आली. याआधीच लष्करात दाखल झालेल्या या क्षेपणास्त्राची परिणामकारकता व अचूकता वाढवण्यासाठी ही चाचणी झाली.

### आयटी रिटर्न्स, कामगिरीचा अहवाल माहिती अधिकाराच्या बाहेर

नवी दिल्ली : इन्कम टॅक्स रिटर्न्स तसेच

# बालगुन्हेगारीविरोधात 'बाल पोलिस पथक'

ठाणे ■ संदीप शिंदे

राज्यात बालगुन्हेगारीचे वाढते प्रमाण लक्षात घेता ती रोखण्यासाठी आणि या गुन्ह्यांमध्ये सामील होणाऱ्या अल्पवयीन मुलांच्या हक्कांचे रक्षण तसेच त्यांच्या पुनर्वसनाचे काम करण्यासाठी प्रत्येक पोलिस ठाण्यात 'बाल पोलिस पथके' स्थापन करण्याचे आदेश सीआयडीच्या विशेष पोलिस महानिरिक्षकांनी जारी केले आहेत. त्यानुसार ठाण्यातील ३२ पोलिस ठाण्यांमध्ये अशी पथके स्थापन करण्यात आली असून राज्याच्या इतर भागातही ती कार्यवाही सुरू आहे.

राज्यातल्या, विशेषतः शहरी भागातल्या बालगुन्हेगारीचे प्रमाण गेल्या दहा वर्षात जवळपास अडीचपटीने वाढले आहे. बालगुन्हेगारांकडून वर्षाकाठी १२७ खून, खुनाचे ९९ प्रयत्न, चार प्राणघातक हल्ले, ८७ बलात्कार, २४ अपहरण, ४४ दरोडे, दरोड्याचे १९ प्रयत्न, घरफोड्या आणि चोरी असे मिळून एकूण १९७० गुन्हे दाखल झालेले आहेत. या गुन्ह्यांमध्ये जवळपास साडेसहा हजार बालगुन्हेगारांचा समावेश आहे. ही आकडेवारी वर्षागणिक वाढतच चालल्याने आयुक्तालय आणि ग्रामीण पोलिस दलात एक विशेष पथक स्थापन करण्याचे आदेश सन २०१० मध्ये राज्य सरकारने दिले होते. मात्र, टाटा इन्स्टिट्यूट फॉर सोशल सायन्सच्या प्रा. डॉ. आशा मुकुंदन यांनी सखोल सर्वेक्षण केल्यानंतर त्या पथकांचा उद्देश सफल होत नसल्याचे निरिक्षण नोंदविले आणि मार्च, २०१२ रोजी महाराष्ट्र राज्याच्या ज्युविनाईल जस्टिस बोर्डाच्या हायकोर्टात झालेल्या एका बैठकीत हे वास्तव मांडण्यात आले. त्यानंतर केवळ आयुक्तालय स्तरावर नव्हे तर प्रत्येक पोलिस ठाण्यात बाल पोलिस पथक नेमण्याचा निर्णय झाला.

### पथकात कोण?

■ जिल्हास्तरीय विशेष बाल पोलिस पथकाचे प्रमुख हे किमान पोलिस उपअधिक्षक किंवा एसीपी दर्जाचे असतील. जिल्हा महिला व बाल कल्याण आयुक्तालयातील प्रोबेशन ऑफिसर आणि सरकारमान्य एनजीओत कार्यरत असलेली एक महिला कार्यकर्ता या पथकात सदस्य असेल. प्रत्येक पोलिस ठाण्यात किमान दोन महिला कर्मचाऱ्यांसह किमान तीन ते चार पोलिसांची नियुक्ती करण्यात येईल. तसेच या पथकांना राज्याच्या कायदा व न्याय विभाग तसेच बालगुन्हेगारीच्या विषयात कार्यरत असलेल्या तज्ज्ञांतर्फे स्पेशल ट्रेनिंग दिले जाणार असल्याची माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली.

### जबाबदारी काय?

■ गुन्हेगारी कृत्यात अडकलेल्या अल्पवयीन मुलांवर लक्ष ठेवून कारवाईची जबाबदारी या बाल पोलिस पथकाला पार पाडावी लागेल. लहान-मोठ्या चोऱ्या तसेच भीक मागण्यासाठी या मुलांना कामाला लावले जाते. अशा घटनांवर वचक ठेवून त्यांच्या पुनर्वसनाचे कामही त्या पथकांवर सोपविले जाणार आहे. पालकांचा शोध घेऊन कोर्टाच्या आदेशाने त्या मुलांना त्यांच्या ताब्यात दिले जाईल, किंवा त्यांच्यात सुधारणा व्हावी, म्हणून बालसुधारगृहात दाखल केले जाईल. पथकात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बंदोबस्त व इतर कामे शक्यतो सोपवली जाणार नसल्याचेही पोलिस सूत्रांनी सांगितले.



# 'अब्जाधीश' फेसबुक!

## ■ यूजर्सची संख्या १०० कोटी

न्यूयॉर्क ■ वृत्तसंस्था

लोकप्रिय सोशल नेटवर्किंग साइट 'फेसबुक'वरील ॲक्टिव्ह युजर्सच्या संख्येने एक अब्जाचा आकडा ओलांडला आहे. याचाच अर्थ, जगातील सात व्यक्तींमागे एक व्यक्ती फेसबुकची सदस्य आहे.

'दर महिन्याला फेसबुक वापरणाऱ्या सक्रीय सदस्यांची संख्या या क्षणी एक अब्जांच्या पलिकडे गेली आहे,' असे फेसबुकचा सहसंस्थापक आणि सीईओ मार्क झुकरबर्ग यांनी म्हटले आहे.

'मला आणि माझ्या लहानशा टीमला तुमची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल आभार! एक अब्ज जणांना एकमेकांशी जोडून घेण्यास मदत करणे हा सुंदर, विनम्र करणारा अनुभव असून माझ्या आयुष्यातील सर्वाधिक अभिमानाची गोष्ट आहे,' असे झुकरबर्गने फेसबुकवर लिहिले.

कॅलिफोर्नियामध्ये मुख्य ऑफिस असलेले 'फेसबुक' जगभरातील २०० देशांमध्ये वापरले जाते. २००४मध्ये स्थापन झालेल्या फेसबुकने सहा वर्षांत ५० कोटी सदस्यसंख्या गाठली. तर त्याच्या दुप्पट आकडा गाठण्यात फेसबुकला आणखी फक्त दोन वर्षे लागली.

# पुण्यातील घोरपडीत तिघांचा खून

पुणे : पुण्यातील घोरपडी येथील **दरोड्याचा** दत्तात्रय कुलकर्णी (७६) हे जखमी झाले

# कर्नल पुरोहित, प्रज्ञा यांना जामीन दूरच

नवी दिल्ली ■ म. टा. विशेष प्रतिनिधी

■ मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण

चालवण्याचे आदेश दिले.